पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील तत्कालीन सिडको प्रशासित भागातील पायाभुत सुविधा व नागरी सेवा पनवेल महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्याकरीता त्रि-सदस्यीय समिती गठित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्र. पमपा-२२१८/प्र.क्र.१०९/नवि-२३
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- २३ मार्च, २०१८

प्रस्तावना :-

दिनांक ०१.१०.२०१६ पासून तत्कालीन पनवेल नगरपालिका, सिडको प्रशासित काही भाग तसेच २९ महसुली गावे यासह पनवेल महानगरपालिकेचे गठण करण्यात आले आहे. सिडको प्रशासित भागामधील पायाभूत सुविधा उदा. उद्याने, प्रशासकीय इमारती, दवाखाने इ. सिडको मार्फत पनवेल शहर महानगरपालिकेस हस्तांतरीत होणे आवश्यक आहे.

तत्कालीन सिडको प्रशासित क्षेत्रामध्ये अद्यापही पायाभूत सुविधा सिडकोच्या अखत्यारीत आहेत व तसेच या क्षेत्रात नागरी सेवा उदा. घनकचरा व्यवस्थापन, पाणीपुरवठा, मल:निस्सारण, साफसफाई, पथदिवे इ. सिडकोमार्फत पुरविण्यात येतात.

स्थानिक प्राधिकरण असल्याने पनवेल महानगरपालिका क्षेत्रात असलेल्या सर्व पायाभूत सुविधा पनवेल महानगरपालिकेच्या अखत्यारित असणे आवश्यक आहे. तसेच नागरिकांना देण्यात येणाऱ्या सर्व नागरी सेवाही पनवेल महानगरपालिकेने पुरविणे अपेक्षित आहे.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील तत्कालीन सिडको प्रशासित भागातील पायाभूत सुविधा निश्चित करून समयबध्द पध्दतीने सिडकोमार्फत पनवेल महानगरपालिकेस हस्तांतरीत करणे आवश्यक आहे. तसेच या क्षेत्रातील नागरी सेवाही सिडकोकडून पनवेल महानगरपालिकेकडे हस्तांतरीत होणे आवश्यक आहे.

याकरीता शासन आता खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे :-

शासन निर्णय :-

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील परंतु, तत्कालीन सिडको प्रशासित भागातील पायाभूत सुविधा तसेच नागरी सेवा सिडकोकडून पनवेल महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करणेकरीता खालील त्रि-सदस्यीय समितीची नेमणूक करण्यात येत आहे:-

१) सह व्यवस्थापकीय संचालक-१, सिडको
२) महापालिका आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका, नवी मुंबई
३) महापालिका आयुक्त, पनवेल महानगरपालिका, पनवेल

०२. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील तत्कालीन सिडको प्रशासित भागातील पायाभूत सुविधांची पाहणी करून उक्त सुविधा निश्चित समयसीमेत पनवेल महानगरपालिकेस हस्तांतरण करणेकरीता Road Map तयार करून तीन महिन्यांच्या आत समितीने शासनास सादर करावा.

तसेच सिडकोमार्फत पुरविण्यात येणाऱ्या नागरी सेवांचे टप्प्याटप्प्याने हस्तांतरण महानगरपालिकेस करणेकरीता निश्चित व समयबध्द योजना तयार करून शासनास सादर करावी.

०३. नागरी सुविधांमध्ये खंड पडू नये याकरीता उक्त पायाभूत सुविधा व नागरी सेवांचे हस्तांतरण सिडको कडून पनवेल महानगरपालिकेला होईपर्यंत तत्कालीन सिडको प्रशासित क्षेत्रांमध्ये सिडकोने सर्व पायाभूत सुविधांची निगा व दुरुस्ती करावी तसेच यापुर्वी त्यांचे मार्फत पुरविण्यात येणाऱ्या सर्व नागरी सुविधा हस्तांतरण प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सुरु ठेवाव्यात.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२३१२४११०५२२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Shankar Trambak Jadhav
Date: 2018.03.23 16:38:05 +05'30'

(शंकर जाधव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव, नगर विकास विभाग-१, मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव, नगर विकास विभाग-२, मंत्रालय, मुंबई
५. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको, नवी मुंबई
६. सह व्यवस्थापकीय संचालक-१, सिडको
७. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका, ठाणे
८. आयुक्त, पनवेल महानगरपालिका, पनवेल, जि.रायगड.
९. महासंचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
११. विरोधी पक्ष नेते, महाराष्ट्र विधानसभा, यांचे खाजगी सचिव
१२. विरोधी पक्ष नेते, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव
१३. मंत्री यांचे खाजगी सचिव (उर्वरीत सर्व), मंत्रालय, मुंबई
१४. राज्यमंत्री, नगर विकास विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१५. राज्यमंत्री सर्व विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१६. मुख्यलेखापरिक्षक, स्थानिक निधीलेखा, मुंबई.
१७. उप मुख्यलेखापरिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण महसुल विभाग.
१८. विभागीय आयुक्त, कोकण महसुल विभाग, सी.बी.डी. बेलापूर.
१९. जिल्हाधिकारी, जि. रायगड
२०. जिल्हाधिकारी, ठाणे
२१. निवड नस्ती, नवि-२३.